Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
October-November-December 2020
Vol. 7 Issue 4



**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Dictionary of Research Journal Indexing (DRJI)
- www.worldcat.org
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Gods and Mythologies of Greece and India – The Similarities | Dr. Ganesh Chavan | 06 |
| 2 | Understanding the Female and the Feminine in Vyasa's Mahabharata | Bhavya Arora | 08 |
| 3 | Similarity in the Iliad and the Ramayana | Dr. Ganesh Chavan | 12 |
| 4 | Feminism : A Protest Against Men? | Miss. Akshata Pansare | 17 |
| 5 | Domestic Violence in Marital Relationship in the Novel 'Mother of 1084' : A Pragma-Stylistic Study | Preeti Kaushal | 20 |
| 6 | 'Tardy Dreams' of Black Americans in Lorraine Hansberry's 'A Raisin in the Sun' | Dr. Tabassum Inamdar | 27 |
| 7 | Grey Literature : An Important Resource | Dr. Anuja Kastikar | 32 |
| 8 | The Contribution of the Dalit Writers, Artists and Singers in the Enrichment of Dalit Literature | Rajesh Kose | 38 |
| 9 | Study the Correlation between Attitude towards Women Empowerment and Gender Equality among Junior College Level Students | Dr. Jayashri Nemade | 44 |
| 10 | Impact of COVID-19 on Indian Economy | Dr. Pramodini Navale (Kadam) | 51 |
| 11 | The Psychological Impact of COVID -19 | Dr. Ranjita Jadhav | 54 |
| 12 | Stepping Back to Move Ahead : Overcoming Pandemic and Achieving Sustainability | Sumedha Dwivedi | 57 |
| 13 | Spatial Pattern of Cropping Intensity in Western Satpura Region of India | Dr. Lalit Sandanshiv | 62 |
| 14 | Wild Vegetables Used by the Tribes K.H Wildlife Sanctuary | Dr. Sangita Dandwate | 67 |
| 15 | 'CONNECT': A Model Proposing Social Outreach of Higher Education Institutions | Dr. Ravidra Singh | 70 |
| 16 | To Study Thermogravimetric Stability of two Commercial Samples | Dr. Rupali Gulalkari | 74 |
| 17 | Best Cost Entry Method for the Solution of Transportation Problem | Dr. Kishor Ingale, Dr. D. D. Pawar | 79 |
| 18 | Examination of Physico-Chemical Properties of Water of Chorkund Lake, Chorkund. District: Yavatmal.(M.S.).India | C. R. Kasar | 84 |
| 19 | Importance of E-Resources in Research Work | Yogesh Bhadane | 88 |
| 20 | Critical Analysis of Financial Aspects of Selected NACC Societies | Dr. B. S. Salunkhe | 91 |
| 21 | A Study of Children's Rights Awareness among Primary School Teachers and Students | Dr. Kunda Baviskar | 97 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 22 | भाषा का जैविक आधार | प्रो. मोहन | 102 |
| 23 | संत कबीर की प्रासंगिकता | डॉ. सुनील व्यवहारे | 112 |
| 24 | श्री.गुरु ग्रंथ साहिब जी में निहीत मानव-मूल्य | राजिंदरकौर महाजन | 117 |
| 25 | हिंदी सन्त परम्परा और रैदास | डॉ. सुनील व्यवहारे | 121 |

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | प्रेमचंदयुगीन हिन्दी कथा-साहित्य में ग्राम्यजीवन | **डॉ. भिमराव मानकरे** | 125 |
| 27 | प्रेमचंद की कहानियों में दलित चेतना | **डॉ. परविंदरकौर महाजन** | 129 |
| 28 | धनगर जनजातियों में सामाजिक एवं सांस्कृतिक स्थितियों में परिवर्तन के संकेत | **डॉ.गणपत राठोड** | 132 |
| 29 | दिनकर के काव्य में राष्ट्रीय चेतना | **डॉ.महेंद्रसिंग पवार** | 136 |
| 30 | बीसवी सदी के अंतिम दशक का साहित्य : भाषा व शिल्प | **डॉ. संतोष पवार** | 140 |
| 31 | हिंदी में अनुदित दलित मराठी आत्मकथाओं में चित्रित समस्याएँ | **डॉ.भारत खिलारे** | 144 |
| 32 | वेदना एकाकीपन की : कृष्णा सोबती की नज़र में | **डॉ. संतोष पवार** | 152 |
| 33 | नारी समस्या और कृष्णा सोबती के उपन्यास | **अनिता देवी** | 158 |
| 34 | ज्ञानप्रकाश विवेक की ग़ज़लों में व्यक्त जीवन-दर्शन | **डॉ. जे.व्ही.पाटील, अनिल सूर्यवंशी** | 163 |
| 35 | ‘दरमियाना’ में किन्नरों की राजनैतिक चेतना | **डॉ. विलास कांबळे** | 169 |
| 36 | ‘मुन्नी मोबाईल’ - कॉल सेंटरों में कार्यरत युवाओं के काले जीवन की कहानी | **डॉ.सन्मुख मुच्छटे** | 176 |
| | **मराठी विभाग** | | |
| 37 | लोकसाहित्य – अक्षर वाङ्मय | **डॉ. व्यंकटेश पोटफोडे** | 180 |
| 38 | लोकतत्त्व व इहवादाचा अनुबंध | **स्वाती लवंगे, डॉ. दिलीप पवार** | 186 |
| 39 | भिल्ल जमातीच्या संस्कृतीतील होळी : एक सण | **डॉ. चांगदेव मुंढे** | 193 |
| 40 | ओतारी समाजातील विवाहपद्धती | **प्रा.विक्रम ओतारी** | 198 |
| 41 | आदिवासी बोलीभाषा : वास्तव आणि आव्हाने | **डॉ. सुलतान पवार** | 202 |
| 42 | श्रीचक्रधरस्वामींचे व्यक्तिदर्शन | **डॉ.अंजली पांडे** | 208 |
| 43 | पसायदान : एक आकलन (२) | **डॉ. पुरुषोत्तम जुन्ने** | 212 |
| 44 | सामाजिक क्रांतीच्या युगस्त्री : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | **डॉ.श्रीकांत गायकवाड** | 218 |
| 45 | सोपान खुडे ह्यांचे नाटक ‘सम्राट अशोक’ | **राहुल गायकवाड** | 226 |
| 46 | भारत सासणे यांच्या कथेतील जीवनदर्शन | **डॉ. बाबाराव ठावरी** | 231 |
| 47 | मराठी कथेची उत्क्रांती | **डॉ. तीर्थराज कापगते** | 236 |
| 48 | ‘रानसय’ मधून व्यक्त होणारे ग्रामवास्तव | **प्रा. ज्ञानेश्वर मुंढे** | 244 |
| 49 | कामगार कवितेतील सामाजिक जाणिवा : एक दृष्टिक्षेप | **डॉ. दिलीप पवार** | 248 |
| 50 | ल. सी. जाधवांच्या कादंबऱ्यांचे आशयसूत्र व त्यांचे वेगळेपण | **मिनाक्षी गोणारकर** | 253 |
| 51 | तौलनिक साहित्य आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास | **डॉ. प्रकाश जाधव** | 258 |
| 52 | डॉ. दादा गोरे यांचे कथाविश्व | **डॉ. पुरुषोत्तम जुन्ने** | 261 |
| 53 | ‘डाळ’ : एक ग्रामीण कादंबरी | **डॉ. रावसाहेब ननावरे** | 268 |
| 54 | मराठी साहित्य आणि मानसशास्त्र परस्पर संबंध | **डॉ. भास्कर शेळके** | 271 |
| 55 | भिल्ल संस्कृतीतील काही प्रतीके | **डॉ. चांगदेव मुंढे** | 280 |
| 56 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवकल्याणविषयक आर्थिक विचार | **प्रा.विलास सोळुंके** | 284 |
| 57 | ‘स्वच्छ भारत मिशन’ योजनेचे तात्त्विक अधिष्ठान | **डॉ. पंडित लावंड** | 290 |
| 58 | ‘आत्मनिर्भर भारत अभियान’ : एक विश्लेषणात्मक अभ्यास | **डॉ. रामदास मुकटे** | 296 |
| 59 | ‘कोविड १९’ चा भारताच्या वाहन उद्योग व जी.एस.टी.संकलनावरील परिणाम | **डॉ. शामराव वायसे** | 301 |
| 60 | जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यामधील ग्रामीण विकासात शेततळ्यांची भूमिका - एक भौगोलिक अभ्यास | **डॉ. रंजीता जाधव** | 306 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal

E-ISSN :
2348-7143
Oct.-Nov.-Dec.
2020



| | | | |
|---|---|---|---|
| **61** | वऱ्हाड प्रांतातील राजकीय स्थित्यंतरे (प्राचीन काळ) | **डॉ. धिरजकुमार नजान** | **312** |
| **62** | वाचन वृद्धीसाठी महाविद्यालयातील नाविन्यपूर्ण विविध उपक्रम | **प्रा. उमेश गावंडे** | **318** |
| **63** | नाशिकच्या कुंभमेळयातील संज्ञापन प्रक्रिया व साधने | **डॉ. उज्ज्वला बर्वे, संपत देवगिरे** | **322** |
| **64** | 'हावठण' : कुंबार समाजाची संघर्शगाथा (कोंकणी भाषेतील शोधनिबंध) | **ग्लिनिस डायस** | **332** |
| | **उर्दू विभाग** | | |
| **65** | اُردو اور ہندوستانیت | **ڈاکٹر سید اصفیہ مدنی زکریہ** | **340** |
| **66** | سیّد مہدی حسن احسن لکھنوی، اردو کے اہم ڈرامہ نگار | **مقالہ نگار & رشیدالنساءمحمّد یوسف** | **343** |



*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**Published by –**

**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**

**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# लोकतत्त्व व इहवादाचा अनुबंध

**स्वाती वासुदेव लवंगे**
संशोधक विद्यार्थिनी, मराठी विभाग व संशोधन केंद्र
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक ०२.

**डॉ. दिलीप पवार**
संशोधन मार्गदर्शक व मराठी विभाग प्रमुख
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक ०२.

**प्रस्तावना :**

*आदिम अवस्थेत माणूस एकटा राहत असे मात्र स्वसंरक्षणाच्या दृष्टीने तो कळप करून राहू लागला, त्यानंतर त्या त्या कळपाचे नीतिनियम माणसांने निर्माण केले. हे नीतिनियम त्याच्या भौतिक जगण्याशी संबंधित होते. या जीवनव्यवहारात निसर्गातील काही घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा देखील प्रयत्न माणसाने त्याच्या आदिम अवस्थेत केला. ज्या घटनांचे अर्थ माणूस तर्काने लावू शकला नाही त्या ठिकाणी काल्पनिकता देखील त्याच्या या जीवनव्यवहारात आली. माणूस हा बुद्धिमान प्राणी असल्याने तो विचार करू शकतो. त्याने घेतलेले ज्ञान अनुभव विचार त्याच्या पुढील वर्तनावर परिणाम करणारे ठरतात. हे ज्ञान, अनुभव व विचार माणूस परस्परांसोबत वाटू शकतो. यातूनच समूहाचे वर्तनदेखील नियंत्रित होत राहिले, संस्कारित होत राहिले. माणसाचे हे ज्ञान, अनुभव, विचार सामूहिक रुपाने पिढ्यानपिढ्या संक्रमित होत राहिले. यातूनच मानवी संस्कृती विकसित होत राहिली. त्याच्या पिढ्या दर पिढ्या या अनुभवातील ज्ञान अद्ययावत होत राहिले. त्याच्या ऐहिक जीवनातील या लोकानुभवांनीच लोकतत्त्वांचे स्वरूप धारण केले आहे. ही लोकतत्त्वे त्याच्या ऐहिक जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. यासंदर्भात डॉ. म. सु. पगारे म्हणतात, "लोकतत्व आणि ऐहिक जीवनाचे परस्पर संबंध मानवाच्या आदिमतेपासून आहेत. पृथ्वी, लोक आणि त्यांचे ऐहिक जीवन हा प्राचीन काळापासून स्थिर झालेला पारंपरिक लोकतत्त्वाचा पाया म्हटला पाहिजे."[१] डॉ. म. सु. पगारे यांचे वरील विधान मानवी संस्कृतीच्या उदयापासून लोकतत्त्व आणि ऐहिक जीवनातील नीतिनियम यातील अन्योन्य संबंधाचा निर्देश करणारे आहे. लोकतत्त्व आणि इहवादाच्या याच परस्पर संबंधांचा शोध प्रस्तुत शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे.*

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. लोकतत्त्वचे स्वरूप स्पष्ट करणे
२. इहवादाच्या स्वरूपावर प्रकाश टाकणे.
३. लोकतत्व व इहवाद यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भान्वयी संशोधन पद्धती, कार्यान्वयी संशोधन पध्दत्ती व समाजशास्त्रीय संशोधन पद्धती वापरण्यात आलेली आहे.

**लोकतत्व संकल्पना व स्वरूप :**

इंग्रजीतील 'folk elements' या संकल्पनेसाठी मराठीत 'लोकतत्व' हा शब्द रूढ झाला आहे. लोकतत्त्व या संकल्पनेच्या संदर्भात सौ. अनिता मुजुमदार म्हणतात, "माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची घडण परंपरेने केलेली असते. त्यामुळे त्याच्या अनुभवाचा आविष्कार होत असतांना त्यात 'folk elements' म्हणजेच 'लोकतत्त्वे'

प्रकट होत असतात. म्हणजेच आदिम अवस्थेतील माणसाच्या विकसित होत जाण्याच्या कालपरंपरेतील अनुभवांच्या आधारे विविध क्षेत्रातील जे ज्ञान पिढ्यानपिढ्या एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने चालत येते त्या ज्ञानाला किंवा त्या ज्ञानाच्या आधारे निर्माण झालेल्या तत्त्वांनाच 'लोकतत्त्व' म्हणता येईल."२ तर डॉ. म. सु. पगारे म्हणतात, "folk elements म्हणजेच लोकांची पायाभूत तत्त्वे, मूलतत्वे, ही अकृत्रिमतेशी संबंधित असतात. (लोकांची मूलतत्त्वे') चा संबंध माणसांच्या संदर्भात तपासणे म्हणजे त्यांच्या सुरुवातीपासूनच्या आदिम सांस्कृतिक घटकांचा परिचय करून घेणे होय."३ लोकतत्वे ही अकृत्रिम असतात कारण ती अनुभवाधिष्ठित असतात. आदिम सांस्कृतिक घटक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होतांना कालानुक्रमे त्यात बदल संभवू शकतो, मात्र काही तत्त्वे ही कालपरंपरेत टिकून राहतात. यासंदर्भात असेही म्हणता येईल की, मानवी संस्कृतीच्या विकसनशील (विकसित होण्याच्या पूर्वस्थितीतील) लोकसंस्कृतीच्या सर्वच घटकांना 'लोकतत्त्व' म्हणता येईल. डॉ. शरद व्यवहारे म्हणतात, "लोकसंस्कृतीच्या अविभाज्य घटकांना 'लोकतत्त्व' म्हणता येईल. परंपरा, रूढी, प्रथा, लोकविश्वास, विधी, शुभअशुभाच्या कल्पना इ.तून लोकतत्वांचा प्रत्यय येतो. तेव्हा असे विचार, अशी तत्वे, अशा भावना की, ज्या लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत सहाय्यभूत झाल्या त्यांना 'लोकतत्त्व' म्हणता येईल."४ डॉ. शरद व्यवहारे यांची लोकतत्त्वांची ही व्याख्या व्यापक म्हणता येईल. लोकनिर्मित सर्वच घटकांचा 'लोकतत्त्व' या संकल्पनेत त्यांनी समावेश केलेला दिसतो. हाच धागा पकडून लोकसाहित्याचे हिंदी भाषिक अभ्यासक डॉ. सत्येंद्र यांची व्याख्या येथे सांगता येईल ते म्हणतात, "जो एक परंपरा के प्रभाव में जीवित रहता है, ऐसे लोक की अभिव्यक्ति में जो तत्त्व मिलते है वह 'लोकतत्त्व' कहलाते है अतः कहा जा सकता है की लोक, बौद्धिक चेतना, संस्कृत तथा परिष्कृत रुचीवाले मनुष्य के समुदायसे इतर अभिजात संस्कार एवं शिक्षा से ही एक ऐसा समुदाय है, जो आदिम प्रवृत्तीयों तथा परंपराओ की धारा मे बहता हुआ अकृत्रिम जीवन जीने में विश्वास रखता है ऐसे लोक की अभिव्यक्ती जीन तत्त्वो के माध्यम से होती है वे 'लोकतत्त्व' कहलाते है."५ डॉ.सत्येंद्र यांच्या म्हणण्यानुसार अशिक्षित अडाणी लोकांची अभिव्यक्ती असणारी तत्वे ही लोकतत्त्वे आहेत. सुशिक्षितांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीपेक्षा या निरक्षर लोकांची सांस्कृतिक अभिव्यक्ती ही भिन्न असते. हे जरी मान्य केले तरी साक्षर किंवा सुशिक्षित म्हणविल्या जाणाऱ्या लोकसमूहाच्या जीवन अभिव्यक्तीवर या अशिक्षित म्हणविल्या जाणाऱ्या पूर्व परंपरेच्या अभिव्यक्तीचा प्रभाव पूर्णपणे संपलेला असतो असे म्हणता येत नाही. त्यामुळे या लोकतत्त्वांचा आढळ सुशिक्षित समुदायाच्या सांस्कृतीक अभिव्यक्तीमध्ये केवळ अवशेष रूपानेच नाही तर बऱ्याचदा अपरिहार्यपणे देखील असलेला दिसतो.

वरील अभ्यासकांच्या मतांचा विचार करता 'लोकतत्त्व' या संकल्पनेत लोक हा महत्त्वाचा घटक असून तो समूह जीवनाशी निगडित आहे हे स्पष्ट होते. इंग्रजीतील folk या शब्दा साठी वापरला जाणारा हा शब्द परंपरेने जीवन व्यतीत करणाऱ्या अनागर समूहाचे प्रतिनिधित्व करतो. परंपरेने प्राप्त अनुभवाधिष्ठित ज्ञानातून पिढ्यानपिढ्या प्रवाहित असणाऱ्या तत्वांना 'लोकतत्त्व' म्हणता येईल. या लोकतत्वांचा आढळ अशिक्षितांच्या लोकसाहित्यात त्याचबरोबर शिक्षितांच्या लौकिक साहित्यात देखील दिसून येतो.

**इहवाद संकल्पना व स्वरूप :**

इहवादामध्ये प्रत्यक्ष वास्तवरूप जीवन महत्त्वपूर्ण मानले जाते. माणसाचा जन्म ते मृत्यू पर्यंतचा प्रवास ही प्रत्येक व्यक्तीच्या ऐहिक जीवनाची कक्षा असते. त्यामुळे जन्म ते मृत्यूपर्यंतच्या जीवन प्रवासाला सत्य

मानणे, या जीवन प्रवासात येणाऱ्या प्रत्यक्ष अनुभूती, वास्तववादी जीवनानुभव याच गोष्टी केवळ सत्य असून ज्या गोष्टी प्रत्यक्ष दिसत नाहीत किंवा अनुभवताही येत नाहीत त्यांना काल्पनिक ठरवून जीवन प्रवास करणे म्हणजेच 'इहवादी' विचार होय. बुद्धिप्रामाण्य, विवेक, विज्ञान, सत्यनिष्ठा, वास्तवजीवन इ. गोष्टींना इहवादात महत्त्व आहे. Shorter Oxford Dictionary मध्ये 'इहवाद' ही संकल्पना स्पष्ट करताना पुढील व्याख्या केलेली आढळते, "The doctrine that morality should be based solely on regard to the well-being of mankind in the present life to the exclusion of all considerations drawn from belief in God or a future state"[६] कुठलाही देव आणि धर्म याचा धाक दाखवून निर्माण केलेली नितीमुल्ये ही काल्पनिकतेवर आधारित असल्यामुळे ती ढासळू शकतात. परंतु माणसाचे वास्तव जीवन डोळ्यासमोर ठेवून मानवी जीवनाच्या सुरक्षिततेसाठी आणि समृद्धीसाठी मानवाच्या वास्तव जीवनानुभवाच्या आधारे निर्माण झालेली जीवनमूल्ये विषयक नीतिनियम ही माणसाला अधिक संस्कारी, विचार प्रवर्तक आणि समाजशील नागरिक घडवू शकतात. कारण काल्पनिकतेवर आधारित नीतिनियमांची इमारत काल्पनिकतेच्या पायावर तग धरू शकत नाही. ती काल्पनिकता उघड झाली की ही नीतिनियमांची इमारत ढासळण्याची शक्यता अधिक आहे. देवाचे अस्तित्व न मानणाऱ्या माणसाला दैववादाचा धाक दाखवून कितीवेळ थांबवता येईल? असाही प्रश्न त्यामुळे विचारला जाऊ शकतो.

इहवादाच्या संदर्भात बृहत हिंदी कोशात 'इह' या शब्दाचा अर्थ 'यहा, इस लोक में', 'इस काल में', 'इहजीवन' असा दिलेला आहे.[७] तर समाज विज्ञान कोशाचे खंड १ मध्ये डॉ. स.मा गर्गे यांनी इहवादाच्या संदर्भात नोंदवलेला सार रूपाने पुढीलप्रमाणे देता येईल, "इहवाद म्हणजे या जगाच्या संदर्भात केलेला विचार असून तो रूढ धर्मातील मोक्ष, आत्मा-परमात्मा आणि पुनर्जन्म या घटकांना नकार देतो. इहवादात मनुष्यजीवन (जन्म ते मृत्यूपर्यंतचा प्रवास) त्यातील समस्या, अर्थ आणि काम, अनुभवजन्य ज्ञान, आणि मानवी जीवन यांचा विचार येतो. पारलौकिक जीवनाचे अस्तित्व इहवादाला मान्य नाही. विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य, विज्ञानवाद ही इहवादाची लक्षणे आहेत. वास्तवाधारित मानवी जीवन हेच सर्व नीतिमूल्यांचा मानदंड असले पाहिजे."[८] स. मा. गर्गे यांच्या इहवादा संदर्भातील विवेचनावरून 'इहवाद' ही संकल्पना अधिक स्पष्ट होते. ऐहिक भौतिक जीवनाला प्राधान्य देणारी वास्तववाद, बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञानवाद यावर आधारित असणारी आणि माणसाला केंद्रवर्ती ठेवून त्याचे व्यक्तीस्वातंत्र्य मान्य करणारी ही एक विचारप्रणाली आहे. हे यावरून स्पष्ट होते.

इहवादाला 'लोकायत' तत्वज्ञान असेही म्हटले जाते. लोकायताची 'लोकेषु आयतः लोकायतः' ही संस्कृतातील व्याख्या सर्वश्रुत आहे. या व्याख्येवरूनच लौकिक जीवनाला महत्त्व देणारे हे 'लोकायत' तत्वज्ञान असल्याचे सांगितले जाते. चार्वाक हा या इहवादी तत्त्वज्ञानाचा आद्य प्रणेता मानला जातो. बृहस्पती हा त्याचा गुरु असल्याने बृहस्पतीच्या नावावरून बार्हस्पात्य तत्त्वज्ञान असेही त्याला संबोधले जाते. जन्म ते मृत्यूपर्यंतचा प्रवास हाच सत्य असून या जन्मातच माणसाने सर्व उपलब्ध सुख सुविधांचा उपभोग घ्यावा कारण मृत्यूनंतर शरीर भस्मीभूत झाल्यावर त्याचे पुनरागमन शक्य नाही हा विचार मांडणारा चार्वाकाचा पुढील श्लोक प्रसिद्ध आहे. ***"यावज्जीवेम सुखम् जीवेत् । ऋणं कृत्वां घृतं पिबेत । भस्मीभूतस्य देहस्य । पुनरागमनः कुतः ।।"*** अर्थात इहशी म्हणजेच ऐहिकतेशी संबंधित असणारा हा श्लोक माणसाच्या इहवादी अस्तित्वालाच फक्त मान्य करतो.

इहवादासाठी 'भौतिकवाद' हा देखील शब्द वापरला जातो. यालाच इंग्रजीमध्ये materialism असेही म्हणतात. भौतिकवादाचा प्रणेता प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता इपिक्यूरस हा मानला जातो. भौतिकवादी तत्त्वज्ञानाची सैद्धांतिक मांडणी करताना तो म्हणतो, "नैतिक मूल्ये स्थलकालाप्रमाणे बनतात व्यवहारात येतात आणि बदलतात. माणसाचे ऐहिक जीवन आणि शारीरिक सुख यांनाच महत्त्व असते."९ भौतिक अस्तित्वाला महत्त्व देणारी materialism ही विचारप्रणाली असून इपिक्युरसच्या मते सर्व मानवी जीवन आपल्या सभोवतालच्या वास्तवदर्शी भौतिक सृष्टीतून (material मधून) निर्माण झालेले असते. या भौतिक दृश्यमान सृष्टीमध्ये देव, मोक्ष, दैवी किंवा आसुरी शक्ती या बाबी अभौतिक असल्याने त्यांना स्थान नाही. मात्र माणूस आणि त्याच्या सभोवतालच्या सर्व वस्तू या भौतिक आणि वास्तव आहेत आणि त्यांचा परस्परांवरील परिणाम हा ऐहिक अनुभव आहे.

काही अभ्यासक 'सेक्युलॅरिझम' या संकल्पनेचाही संबंध इहवादाशी जोडतात तर काही अभ्यासक 'सेक्युलॅलिझम' आणि 'इहवाद' यामध्ये फरक करतांनाही दिसतात. जेम्स हेस्टिंग्जने संपादित केलेल्या 'Encyclopedia of Religion and Ethics' यामध्ये सेक्युलॅलिझमच्या नोंदीपुढे इहवादाची व्याख्या करतांना "राजकीय आणि तात्विक पूर्वइतिहास असलेली ती एक बुद्धी पुरसरः नैतिक आणि धर्माच्या विरोधात उभी असलेली चळवळ आहे"१० असे म्हटले आहे. तर Yaniv Roznai या संशोधकाने "Negotiating the Eternal: The Paradox of Entrenching Secularism in Constitutions" या आपल्या शोधनिबंधात इहवादासंबधी पुढील व्याख्या केलेली आहे. तो म्हणतो, "As a philosophy, secularism seeks to interpret life on principles taken solely from the material world, without recourse to religion. It shifts the focus from religion towards "temporal" and material concerns."११

वरील दोन्ही व्याख्यांवरून सेक्युलॅरिझमने धर्मातील तत्त्वांना विरोध केलेला असल्याचे लक्षात येते. तथापि धर्मातील सर्वच तत्त्व ऐहिकतेच्या विरोधात आहेत असे मात्र म्हणता येत नाही. पारंपरिक धर्मसंकल्पनेत आत्मा, परलोक, पुनर्जन्म या संकल्पना अभौतिक व काल्पनिक असल्याने धर्म संप्रदायातील तत्त्वज्ञानाला 'सेक्युलरिझम' विरोध करतो मात्र या संकल्पना देखील निर्माण करणारी माणसं असतात आणि या संकल्पनांच्या निर्मितीमागे इहलोकाची चिंता वा विचारच असतो. यासंदर्भात डॉ. नरहर कुरुंदकर म्हणतात, "सबंध ईश्वरवादाचा विचार सुद्धा इहलोकाच्या चिंतेतूनच व त्या संदर्भातच चालू असतो."१२ नरहर कुरुंदकरांचे हे मत लक्षात घेता धर्म आणि धर्मातील तत्त्वज्ञान, अध्यात्म विविध सांप्रदायिक तत्वज्ञान याच्या अस्तित्त्वाचे कारण ऐहिकता, 'इहवाद' आहे असेच म्हणावे लागेल. डॉ. म. सु. पगारे यांचे मत देखील यासंदर्भात नोंदवता येईल, ते म्हणतात, "अध्यात्मिक मार्गाने जाणारा माणूसही इहवादीच असतो. इहवादातील विशुद्ध स्वरूप आणि धर्माचे विशुद्ध स्वरूप एकाच सीमारेषेवर येते. धर्मातील विशुद्ध स्वरूप हे जीवनातील अंतिम सत्य दाखवणारे आहे. धर्मातील विविध तत्त्ववेत्त्यांनी मांडलेले विचार आकलन झाले तर धर्माचे कर्मकांड सदृश्य असणारे स्वरूप नष्ट होईल. इहवादी लोकांच्या मताप्रमाणे माणसाचे ईश्वराशी असलेले परस्पर संबंध एवढाच विषय आणि आशय धर्मात आहे, परंतु तसे नाही धर्मामध्ये समाजरचना, नीती, तत्वज्ञान या गोष्टींचाही समावेश होतो. मानवाच्या जीवनातील सर्वच अंगांना स्पर्श करण्याची भूमिका धर्मामध्ये आहे. परोपकार, प्रेम, त्याग, माणुसकी या विशुद्ध संकल्पना शुद्ध धर्मामुळे बळावतात. एखादी व्यक्ती धार्मिक आहे, याचा अर्थ ती व्यक्ती इहवादी जाणीवेशिवाय आयुष्यातील मार्गक्रमण करते असा नव्हे. धार्मिक असणारा आणि अध्यात्म

जोपासणाराही प्रत्येक माणूस इहवादी आहेच. भौतिक गरजांशिवाय त्याला आपले आयुष्य जगताच येणार नाही. धर्म हा माणसाला आंधळा न बनवता सद्वर्तनी बनवणारा असला तर इहवादाचे ते विकसित रूप ठरू शकते. प्रेम, परोपकार, त्याग या विशुद्ध कल्पना इहवादात रोवून माणसाचे आयुष्य सुसंस्कारित होऊ शकते. तथापि रूढ धर्मवादाला इहवादाने नकार दिला किंवा ईश्वराला नकार दिल्याने फारसा फरक पडत नसला तरी धर्मातून नैतिकतेचा अंकुश जो सर्वसामान्य माणसाच्या मनावर राहतो तो शुद्ध इहवाद न पचल्यामुळे राहू शकत नाही. त्यामुळे इहवादाच्या विशुद्ध भूमिके प्रमाणे (जसेच्या तसे) आचरण करणे दूरच राहते. त्यामुळे इहवादी जीवन जगत असताना माणसाला इंद्रिय संयमन न करता आल्यामुळे षड्रिपूंचा अतिरेक होऊन स्वैराचारी वृत्ती बळावते आणि त्याचा दोष इहवादाला दिला जातो. त्यामुळे धर्माच्या अंकुशाचीही गरज भासू लागते. धर्मवादाला गुढवादात लोटून त्यातील शुद्ध स्वरूपाच्या संकल्पनाही पुसून टाकण्याचा प्रयत्न म्हणजे सदाचारी माणसाच्या जीवनातील आदर्श पुसण्या सारखे ठरते."[१३] डॉ. म.सु.पगारे यांचे धर्म आणि इहवादासंदर्भातील वरील विचार अधिक समतोल म्हणावे लागतील. कोणतीही विचार प्रणाली ती धार्मिक असो किंवा राजकीय त्याला दोन बाजू असलेल्या आढळतात. सकारात्मक आणि नकारात्मक बाजू समजून घेऊन बुद्धिप्रामाण्य, विवेक याच्या आधारे प्रत्येक तत्त्वप्रणाली समजून घ्यावी लागते. इहवाद आणि धर्मातील गुणदोष देखील याच आधारावर माणूस केंद्रवर्ती ठेवून तपासले जायला हवेत आणि नीरक्षीर विवेकाने धर्म आणि इहवादाच्या सकारात्मक मानवकल्याणकारी तत्त्वांचा शोध घेतला जायला हवा. हा शोध घेण्यासाठी लोकानुभवांतून निर्माण झालेली लोकतत्त्वे सहाय्यभूत ठरू शकतात. मात्र या लोकतत्वांना श्रद्धांच्या सोबत चिकटलेली अंधश्रद्धांची पुटे रुढी आणि परंपरांसोबत चिकटलेली कर्मकांडाची पुटे विवेक आणि बुद्धिप्रामाण्यने वेगळी करता यायला हवीत आणि लोकतत्त्वांच्या विशुद्ध, नैसर्गिक व अकृत्रिम रूपांच्या आधारावरच ऐहिक जीवनासंदर्भातील नीती नियमांची निर्मिती व्हायला हवी. पारंपरिक धर्म संकल्पनेतील नितीनियमांचे विशुद्ध स्वरूप आणि लोकतत्त्वातील अनुभवाधिष्ठित नीतिनियमांचे विशुद्ध स्वरूप एकाच सीमारेषेवर येण्यामागे त्यांचे इहवादाशी असणारे अन्योन्य संबंध हेच कारण असल्याचे आपल्या लक्षात येते.

**लोकातत्व आणि इहवाद यांच्यातील अनुबंध**

मानवी संस्कृतीच्या विकासात माणसाने घेतलेल्या जीवनानुभवांच्या आधारे त्याच्या ज्या धारणा, समज, आकलन निर्माण झाले ते स्वतः पुरते मर्यादित न ठेवता सामुहिक करणे हा देखील मानवी प्रवृत्तीचा एक भाग ठरला. या धारणा, समज, आकलन, ज्ञानरुपाने पुढील पिढीपर्यंत पिढ्यानपिढ्या झिरपत राहिलेत त्यातूनच लोकतत्वात्मक रूढी-परंपरा संकेत तयार झालेत. हे अनुभव, धारणा, आकलन ऐहिक जीवनातील असल्याने त्याचा संबंध इहवादाशी येतो आणि समूह परंपरेने हे घटक लोकांचे बनून जातात म्हणून त्यांना लोकतत्त्वीय घटक देखील म्हटले जाते. अर्थातच इहवादातील जीवनव्यवहार हा लोकतत्त्वीय घटकांनी नियंत्रित होतो आणि या जीवनव्यवहारात आलेले अनुभव पुढील काळात लोकतत्त्वांच्या रुपाने झिरपत राहतात. काळ बदलला तरी इहशी संबंधित असणारे घटक कोणत्या ना कोणत्या रूपात आपले अस्तित्व टिकवून ठेवतात. उदा- हळदीचे सौंदर्यवर्धक फायदे लक्षात घेऊन जखमांवर हळद लावण्यापासून ते लग्नविधीमध्ये सौंदर्यवर्धक म्हणून हळद लावण्यापर्यंत लोकातत्त्वीय ज्ञान ऐहिक जीवन व्यवहारात पिढ्यानपिढ्या चालत आलेले आहे. आधुनिक युगात बदलत्या सामाजिक संबधात विवाह परंपरा बंद पडून हळद लावणे बंद झाले तरी सौंदर्यवर्धक क्रिम किंवा ऐंटीसेप्टीक मलम यामध्ये हळदीचा वापर करणे व हळदीतील औषधी गुणधर्माचा वेगवेगळया पद्धतीने वापर करणे मात्र पिढ्यानपिढ्या सुरूच राहील. अशा

पद्धतीने लोकतत्त्वातील बहुतांश घटक ऐहिकच असतात. लोकतत्त्वातील ईश्वराचे अस्तित्व मात्र इहवादाला मान्य नाही असे असले तरी ईश्वर या संकल्पनेचा निर्माता माणूस असून ईश्वर निर्मितीमागील व त्या अनुषंगाने येणाऱ्या पारलौकिक संकल्पनांच्या निर्मितीमागील लोकतत्त्वीय भूमिका माणसाचे ऐहिक जीवन सुखी करणे हीच असल्याचे दिसते लोकतत्त्वांमध्ये कृषी जीवनाचे, विवाह संस्कारांचे, लोकवैद्यकाचे जे संदर्भ आढळतात त्यातून मानवी संस्कृतीच्या पूर्वावस्थेतील ऐहिक परंपरा, संकेत, लोकसमज यांचेच दर्शन घडते ते लौकिक असते, ऐहिक असते. पारलौकिक नसते. सणउत्सवांच्या परंपरा, लोकांन्न परंपरा या माणसाच्या ऐहिक जीवनाच्या निदर्शक आहेत. लोकपरंपरेतील नातेसंबंध, त्या अनुषंगाने येणाऱ्या वर्तनपरंपरा या कुटुंबसंस्थेशी निगडित असलेल्या आढळतात. व्यक्तीच्या दुसऱ्या व्यक्तीशी असणाऱ्या परस्पर वर्तन संबंधांवर आधारित लोकत्त्वीय घटक हे सामाजिक नीतिनियमांच्या जडणघडणीस कारणीभूत ठरलेले असतात. त्यांचाही ‘इह’ शी म्हणजेच ऐहिक जीवनाशी संबंध असतो.

**निष्कर्ष :**

लोकतत्व आणी इहवाद या संकल्पना व स्वरूप समजून घेतल्यानंतर पुढील काही निष्कर्ष हाती लागतात

१. लोकतत्वे ही समूहतत्वे आहेत. समूहगत अनुभवाधिष्ठित ज्ञान, लोकरूढी, लोकपरंपरा, लोकसंकेत, लोकविश्वास, लोकभ्रम, लोकविधी, लोकाचार, लोकविचार अशा विविध रूपातून पिढ्यानपिढ्या संक्रमित होत आलेल्या लोकसंस्कृतीच्या घटकांना ‘लोकतत्त्व’ म्हणतात

२. आदिम काळापासूनचा अकृत्रिम नैसर्गिक जीवन व्यवहारातील ज्ञान लोकतत्त्वांमध्ये असते.

३. इहवादाचा संबंध ‘इह’शी, ऐहिक जीवनाशी आहे. जन्म ते मृत्यू पर्यंतच्या प्रवासालाच ‘इहवाद’ सत्य मानतो. पारलौकिक जीवनाचे अस्तित्व, आत्मा, मोक्ष, पुनर्जन्म यासारख्या कल्पना इहवादाला मान्य नाहीत. विवेक बुद्धिप्रामाण्य, विज्ञानवाद, माणूस आणि त्याचे व्यक्तिस्वातंत्र्य याच बाबींचा पुरस्कार इहवाद करतो.

४. भौतिक घटक, मानवी जीवन व त्यांचे परस्पर संबंध, सजीव-निर्जीव सृष्टी याचे अस्तित्व मान्य करणारा इहवाद सेक्युलॅरिझम, लोकायत, भौतिकवाद, जडवाद या संकल्पनांशी साम्यसदृश्य वा पर्यायी म्हणून आलेला असून ऐहिकतेशी संबंधित आहे.

५. इहवाद आणि धर्माचे मूळ व अकृत्रिम नैसर्गिक आणि विशुद्ध स्वरूप मानवतावादी स्वरूपाचे म्हणता येईल.

६. लोकतत्वांचे अकृत्रिम मूळ स्वरूप हे ऐहिक सुखाच्या विचारातून निर्माण झालेले असते. त्यातील लोकरूढी-परंपरा, विधी, विश्वास, संकेत, आचार हे घटक ‘इह’ आहेत. लोकबोलीभाषा या देखील ऐहिक आहेत. त्यातून निर्माण होणारे साहित्य आणि लोकसाहित्य हे देखील ऐहिक निर्मितीच असते. कालौघात लोकतत्व, धर्म आणि इहवाद यातील मूळ विशुद्ध स्वरूपावर चढलेली नकारात्मक पुटे बाजूला सारून यातील मानवतावादी संदर्भ समाज संस्कारीत करणारे ठरतील त्यातून अधिक निकोप संवेदनशील जीवनव्यवहार संचलित होऊ शकतो

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

**संदर्भ :**


१. पगारे (डॉ.) म. सु., अहिराणी लोकगीतातील लोकतत्त्व, इहवाद आणि लोकभाषा, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव, द्वि.आ. १६ मे २००३, पृ.क्र. १७.

२. मुजुमदार (सौ.) अनिता, प्राचीन मराठी वाङ्मयातील लोकतत्त्व, सविता प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ. १९८८, पृ.क्र. १.

३. पगारे (डॉ.) म. सु., अहिराणी लोकगीतातील लोकतत्त्व, इहवाद आणि लोकभाषा, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, द्वि.आ. १६ मे २००३, पृ.क्र. ४६.

४. व्यवहारे (डॉ.) शरद, लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, जानेवारी १९९९, पृ.क्र. १३.

५. गुप्त (डॉ.) गणपतीचंद (संपादक), हिंदी भाषा एवं साहित्य विश्वकोश, ऍटलांटिक पब्लिशर्स,प्र. आ. १९९५, पृ.क्र. १०२४.

६. दीक्षित श्रीनिवास, इहवाद धर्म आणि नीती, पुणे विद्यापीठ प्रकाशन, जुलै १९७७, पृ. क्र. ५.

७. कालिका प्रसाद (संपादक), बृहत हिंदी कोश, बनारस ज्ञान मंदिर लि., प्र.आ. २००९, पृ.क्र.१६७

८. गर्गे (डॉ.) स. मा., भारतीय समाजविज्ञान कोश, खंड १, समाज विज्ञान मंडळ, प्र.आ. १९८६, पृ. क्र. ४४०-४४३.

९. तत्रैव, पृ. क्र. ४३९.

१०. दीक्षित श्रीनिवास, इहवाद धर्म आणि नीती, पुणे विद्यापीठ प्रकाशन, जुलै १९७७, पृ. क्र. ४४.

११. Yaniv Roznai citing Domenic Marbaniang in "Negotiating the Eternal: The Paradox of Entrenching Secularism in Constitutions", Michigan State Law Review 253, 2017, p. 324.

१२. गाडगीळ (डॉ.) स. रा., लोकायत, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, पुणे. नरहर कुरुंदकर, यांच्या पुस्तकाची प्रस्तावना, प्र.आ.१९७४, पृ. क्र. १६.

१३. पगारे (डॉ.) म. सु., अहिराणी लोकगीतातील लोकतत्त्व, इहवाद आणि लोकभाषा, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव, द्वि.आ. १६ मे २००३, पृ.क्र. ६६-६८.